## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आणि

## कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर

यांच्या संयुक्त विद्यमाने

## विशेष श्रमसंस्कार शिबिर

# राष्ट्रीय सेवा योजना

# अहवाल

स्थळ : माळवाडी नं. २ ता. इंदापूर, जि. पुणे

शिबिर कालावधी :

दि. ०३ ते ०९ जानेवारी २०२०

# आमचे आधारस्तंभ

## मा.श्री. हर्षवर्धनजी पाटील

(अध्यक्ष इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ)

## मा. पद्‌माताई भोसले

(उपाध्यक्षा इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ)

## मा.श्री मुकुंदशेठ शहा

(सचिव इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ)

## मा.श्री.बाळासाहेब खटके

(सहसचिव इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ)

## मा.अॅड.मनोहर चौधरी

(खजिनदार इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ)

## प्राचार्य डॉ.संजय चाकणे

(कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर)

## उपप्राचार्य प्रा.नागनाथ ढवळे

(कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर)

रा. से. यो. वि.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर शुक्रवार दि. ०३/०१/२०२० ते गुरुवार दि. ०९/०१/२०२० या कालावधीत मु. पो. माळवाडी नं.२, ता. इंदापूर जि. पुणे, येथे संपन्न होत आहे. या शिबिरातील विविध उपक्रमांना आपण उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे व प्रोत्साहन द्यावे ही नम्र विनंती.

!! उद्घाटन समारंभ !!

शुक्रवार दि. ०३ जानेवारी २०२० रोजी दुपारी ३.०० वा.

❋ अध्यक्ष ❋

**मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील**

अध्यक्ष, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

❋ प्रमुख पाहुणे ❋

**मा. डॉ. महेंद्र कदम**

प्राचार्य, विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी

**मा. श्री. मुकुंदशेठ शहा**

सचिव, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

समारोप समारंभ

गुरुवार दि. ०९/०१/२०२० रोजी स.१० वा

❋ अध्यक्ष ❋

**मा. पद्माताई भोसले**

उपाध्यक्षा, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

❋ प्रमुख पाहुणे ❋

डॉ. प्रभाकर देसाई — संचालक, रासेयो पु.वि.

मा. ॲड. मनोहर चौधरी — खजिनदार, इं.ता.शि.प्र.मं.इंदापूर

मा. श्री. बाळासाहेब खटके

सहसचिव, इं.ता.शि.प्र.मं.इंदापूर

सन्माननीय पत्रकार, इंदापूर तालुका

## विशेष उपक्रम व व्याख्यानमाला

दुपारचे सत्र दु. ३ ते सायं. ५

| वार/दि. | व्याख्याते | विषय |
|---|---|---|
| शनिवार ०४/०१/२० | डॉ. गणेश अय्यर<br>डॉ. भिमाजी भोर | सेंद्रिय शेती<br>खारपड जमिनीची समस्या |
| रविवार ०५/०१/२० | डॉ. संजय मोरे<br>डॉ. भगवान माळी | संत गाडगेबाबा महाराज<br>रासेयो आणि युवक |
| सोमवार ०६/०१/२० | प्रा. संजय शिरसागर<br>प्रा. गायकवाड व्ही. आर | शिक्षण व्यवस्था<br>अंधश्रध्दा निर्मूलन |
| मंगळवार ०७/०१/२० | डॉ. मेमाणे पी.डी.<br>प्रा. एस. व्ही. उबरंडे | पाणी प्रश्न अध्ययन<br>आपत्ती व्यवस्थापन |
| बुधवार ०८/०१/२० | ॲड. सचिन राउत<br>डॉ. प्रकाश पांढरमिसे | कायदा व सुव्यवस्था<br>किल्ले संवर्धन |

शिबिर स्थळाचा नकाशा




सदर कार्यक्रमास उपस्थित राहून शिबिरार्थींना प्रोत्साहन द्यावे ही विनंती

**आपले स्वागतोत्सुक**

**डॉ. संजय चाकणे**

प्राचार्य, कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर

**कार्यक्रम अधिकारी**

प्रा. गौतम यादव
प्रा. सौ. मनिषा गायकवाड
डॉ. गजानन कदम
प्रा. सौ. कल्पना भोसले

**सल्लागार समिती**

प्रा. ज्ञानदेव डोबाळे
उपप्राचार्य आर. कोळेकर
प्रा. गजानन शेवाळे
डॉ. शिवाजी वीर
डॉ. भरत भुजबळ
प्रा. सदाशिव उंबरदंड
प्रा. भगवान भोसले
प्रा. दिगंबर बिरादार
प्रा. सौ. विद्या गायकवाड

**विशेष सहाय्य**

डॉ. महंमद मुलाणी
प्रा. रोहित रुपनवर
प्रा. बाळासाहेब पराडे
श्री. अभिमन्यु भांगरकर

सौ. राणु मारणे (सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत माळवाडी)
श्री. महादेव सालगुडे (उपसरपंच, ग्रामपंचायत माळवाडी)
श्री. अतुल डोंबे (सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत माळवाडी)
सौ. शालिकला व्यवहारे (सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत माळवाडी)
श्री. सुनिल शिंदे (सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत माळवाडी)
श्री. महादेव गार्डे (सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत माळवाडी)
सौ. सुनिता संजय गार्डे (माजी सरपंच माळवाडी)
सौ. सुनिता सतिश मोरे (माजी उपसरपंच माळवाडी)
श्री. ज्ञानदेव व्यवहारे (माजी सरपंच माळवाडी)
श्री. सयाजी डोबाळे (माजी उपसरपंच माळवाडी)
श्री. शिवाजी व्यवहारे (ज्येष्ठ नागरिक माळवाडी)
श्री. काशीराम गार्डे (ज्येष्ठ नागरिक माळवाडी)
श्री. बाळासाहेब व्यवहारे (ज्येष्ठ नागरिक माळवाडी)

शिबिर काळातील प्रकल्प

आरोग्य शिबिर ... जलसंधारण व स्वच्छता अभियान ... जनजागृती
सामाजिक सर्वेक्षण — पर्यावरण जनजागृती
महास्वच्छता अभियान — शिक्षण हक्क जनजागृती
वृक्षारोपण — श्रम संस्कार
सांस्कृतिक कार्यक्रम — व्यसनमुक्ती युवक जनजागृती
अभियान

ग्रामस्थांसाठी विशेष उपक्रम / कार्यक्रम

वेळ सायं. ६ ते ९

०४/०१/२० पथनाट्य सादरीकरण
०५/०१/२० व्याख्याते : डॉ. लक्ष्मण आसबे
०६/०१/२० काव्य वाचन : प्रा. बाळासाहेब पराडे
०७/०१/२० रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा
०८/०१/२० सांस्कृतिक कार्यक्रम

### ❋ दिनचर्या ❋

| | |
|---|---|
| स. ६ ते ७ प्रार्थना | सायं. ५ ते ५.३० चहा |
| ७ ते ७.३० व्यायाम | ५.३० ते ६ अहवाल लेखन |
| ७.३० ते ८ न्याहारी | ६ ते ९ उपक्रम / कार्यक्रम |
| ८ ते १२.३० श्रमदान | ९ ते १० जेवण |
| १२.३० ते ३ भोजन | १० ते १०.३० सर्वांगीण मूल्यमापन |
| ३ ते ५ व्याख्यानमाला | १०.३० शुभरात्री |

### ❋ सदिच्छा भेट ❋

**डॉ. नितिन करमळकर** — कुलगुरू, सा. फु. पु. वि. पुणे

**डॉ. एन. एस. उमराणी** — प्रकुलगुरू, सा. फु. पु. वि. पुणे

**डॉ. अतुल साळुंखे** — राज्य संपर्क अधि. रासेयो मुंबई

**मा. डी. कार्तिकेयन** — प्रादेशिक संचालक, रासेयो, प्रादेशिक संचालनालय, पुणे

**डॉ. प्रफुल्ल पवार** — कुलसचिव, सा. फु. पु. वि. पुणे

**मा. अतुल पाटणकर** — वित्त व लेखा अधिकारी, सा. फु. पु. वि. पुणे

**डॉ. प्रभाकर देसाई** — संचालक, रासेयो, सा. फु. पु. वि. पुणे

**डॉ. विलास कर्डिले** — जिल्हा समन्वयक

**डॉ. प्रकाश पांढरमिसे** — विभागीय समन्वयक

बुक — पोस्ट

प्रति,
मा. श्री. / श्रीमती ..............................
..............................

राष्ट्रीय सेवा योजना

शिबिर काळातील विशेष उपक्रम

| दिनांक | व्याख्याते | उपक्रम |
|---|---|---|
| ०४/०१/२० | डॉ. सतीश भोसले | माती पाणी परिक्षण |
| ०५/०१/२० | डॉ. महंमद मुलाणी | शेतात बांध घालणे |
| ०६/०१/२० | प्रा. रोहित रुपनवर | पाणी अडवा पाणी जिरवा |
| ०७/०१/२० | डॉ. शैलजा कदम | जैवविविधता अभ्यास |
| ०८/०१/२० | डॉ. गजानन चौधरी | जी.आय.एस. सर्वेक्षण |
| ०९/०१/२० | प्रा. नितेश शेवाळे | योग प्रशिक्षण |

❋ प्रेषक ❋

डॉ. संजय चाकणे

प्राचार्य

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
राष्ट्रीय सेवा योजना

(NOT ME BUT YOU)

व

**कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर**

ता. इंदापूर जि. पुणे

यांच्या संयुक्त विद्यमाने

**विशेष श्रमसंस्कार शिबिर**

सस्नेह निमंत्रण
व कार्यक्रम पत्रिका

शुक्रवार दि. ०३ जानेवारी २०२०
ते
गुरुवार दि. ०९ जानेवारी २०२०

शिबिर स्थळ

# माळवाडी नं. २

ता इंदापूर जि. पुणे

## अहवाल लेखन

१. प्रा. नामदेव पवार
२. प्रा. दत्तात्रय रास्ते
३. श्री. हर्षवर्धन नलवडे

## शिबिर काळातील प्रकल्प

१. आरोग्य जागर.—व्यसनमुक्ती व स्वच्छता जलसंवर्धन जनजागृती.
२. मानव विकास सर्वेक्षण

३. महास्वच्छता अभियान

४. वृक्षारोपण

५. सांस्कृतीक कार्यक्रम

६. पर्यावरण जनजागृती

७. शिक्षण हक्क जनजागृती

८. श्रम संस्कार

९. हगणदारी मुक्त गाव जागृती अभियान.

## विशेष उपक्रम व व्याख्यानमाला

दुपारचे सत्र दु ३ ते सायं. ५

| वार दिनांक | व्याख्याते | विषय |
|---|---|---|
| शनिवार<br>०४/०१/२० | डॉ. गणेश अय्यर<br>डॉ. भिमाजी भोर | सेंद्रिय शेती<br>क्षारपड जमिनीची समस्या |
| रविवार<br>०५/०१/२० | डॉ. संजय मोरे<br>डॉ. भगवान माळी | संत गाडगेबाबा महाराज<br>रासेयो आणि युवक |
| सोमवार<br>०६/०१/२० | प्रा. संजय क्षिरसागर<br>प्रा. गायकवाड व्ही. आर. | शिक्षण व्यवस्था<br>अंधश्रध्दा निर्मूलन |
| मंगळवार<br>०७/०१/२० | डॉ. नेमाडे पी. डी.<br>प्रा. सदाशिव उंबरदंड | पाणी प्रश्न अध्ययन<br>आपत्ती व्यवस्थापन |
| बुधवार<br>०८/०१/२० | ॲड. सचिन वाघ<br>प्रा. बाळासाहेब काळे | कायदा व सुव्यवस्था<br>किल्ले संवर्धन |

# शिबिराचा उद्घाटन समारंभ

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरासाठी माळवाडी नं. २ ता. इंदापूर जि. पुणे. हे ठिकाण निवंडल्यानंतर शिबिरस्थळाकडे जाण्यासाठी दि. ०३/०१/२०२० रोजी कार्यक्रम अधिकारी प्रा.गौतम यादव, प्रा. मनिषा गायकवाड, डॉ. गजानन कदम प्रा.कल्पना भोसले यांच्या बरोबर महाविद्यालयातील वरिष्ठ विभागातील १५० स्वयंसेवक माळवाडी नं. २ या ठिकाणी सकाळी १०.०० वाजता दाखल झाले., माळवाडी नं. २ येथे आल्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या ठिकाणी स्वयंसेवकांची राहण्याची सोय करण्यात आली होती. या ठिकाणी आल्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी आपल्या बरोबर आणलेले साहित्य रूम मध्ये ठेवले व याठिकाणच्या परिसराची स्वच्छता करण्यास सुरूवात केली. खोल्या साफसफाई करण्याचे काम स्वयंसेवकांनी हाती घेतले. या मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गणेश मंदिर, हनुमान मंदिर तसेच राहणाऱ्या ठिकाणची स्वच्छता केली, आणि कार्यक्रम अधिकारी यांनी सर्व विद्यार्थ्यांना शिबिर कालावधीत होणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. आणि स्वयंसेवकांना जेवणासाठी सुट्टी दिली. सर्व स्वयंसेवकांनी स्वत:चे जेवण आणले होते सर्व स्वयंसेवकांनी एकत्र येऊन अगदी खेळीमेळीत स्वयंसेवकांशी ओळख करत व गप्पामारत जेवण केले.

सर्व स्वयंसेवकांचे जेवण झाल्यांनतर सर्व स्वयंसेवकांना एकत्रीत बसविण्यात आले व त्यांचे गट पाडण्यात आले. सर्व स्वयंसेवकांचे एकुण ७ गट पाडण्यात आले होते ते पुढील प्रमाणे

१) गोदावरी २) नर्मदा ३) सिंधु ४) कृष्णा ५) भिमा ६) कावेरी ७) निरा

विविध गटांमध्ये कामाची विभागणी करण्यात आली. कार्यक्रम स्थळाची व तेथील परिसराची साफसफाई करून आजुबाजुला १३० झाडांसाठी खड्डे खोदुन वृक्षारोपन करण्यात आले ती पुढीलप्रमाणे पांगारा, पिंपळ, हिरडा, बेडा, कन्हेरी इ. तसेच दुपारी होणा-या उद्घाटन समारंभासाठी पूर्व तयारी करण्यात आली.

# राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिर उद्घाटन समारंभ



दिपप्रज्वलन करताना मान्यवर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर जि. पुणे. यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे माळवाडी नं. २ येथे, गणेश मंदिरात मोठया दिमाखात उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमासाठी उपस्थित होते,

मा. सचिव **श्री. मुकुंदशेठ शहा** (इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ), डॉ. संजय चाकणे (प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर ) मा. दत्ता पांढरे (माजी उपसरपंच, माळवाडी नं. २) मा. श्री. राजाभाऊ गार्डे (सामाजिक कार्यकर्ते) मा. गोकूळ व्यवहारे (सदस्य, ग्रामपंचायत माळवाडी नं. २) मा. बापू गार्डे (युवा कार्यकर्ते) मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालक प्रा. रोहिदास भांगे यांनी केले. तसेच शिबिराच्या कालावधीतील कामांची रूपरेषा मांडली प्रा. गौतम यांदव यांनी मांडली व पाहुण्याचा परिचय करून दिला.



प्रा. गौतम यादव (राष्ट्रीय सेवा योजना, कार्यक्रम अधिकारी) यांनी प्रस्ताविकेत शिबिरात होणा-या कार्यक्रमाचा आढावा घेतला. तसेच गावक-यांसाठी होणा-या कार्यक्रमाची माहिती दिली . ते आपल्या प्रास्ताविकेत म्हणाले की गावचे गावपण समजावून घेणे आज आवश्यक बनले आहे. या शिबिराच्या निमित्ताने महाविद्यालयातील स्वयंसेवक गावातीमध्ये स्वच्छता सर्वेक्षण, ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण इत्यादी उपक्रम पार पाडतील तसेच रोजच्या दिनचर्येविषयी जाणून घेतील व गावातील समस्या, अडीअडचणी, व विकासाची कामे करतील असा मला विश्वास वाटतो. त्यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांचा सत्कार झाडांची रोपे पुस्तके देवून करण्यात आला.



प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करताना












मा. डॉ. संजय चाकणे (प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,इंदापूर)



*महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे स्वयंसेवकांना संबोधित करताना*

डॉ. संजय चाकणे म्हणाले की, एक मोठे काम हाती घेतले आहे ते म्हणजे इंदापूर शहराची जैवविविधता असा प्रयोग करण्याचे ठरविले आहे. आणि हा प्रगोग आपल्या महाविद्यालयामार्फत राबविला जाईल आणि हाच ट्रेन्ड भारतभर जाईल. या प्रयोग प्रक्रियेमध्ये वेगवेगळया ३१ विषयांचा समावेश आहे. तसेच डॉ. संजय चाकणे हे म्हणाले की, या माळवाडी गावामध्ये शिबिर राबवित असताना आपणास आणि स्वयंसेवकास अनेक प्रकारचे धडे शिकायला मिळणार आहेत. तसेच आपण या शिबिरामध्ये एक प्रयोग करूयात आणि तो म्हणजे स्पर्धा परिक्षा. यामध्ये रात्री प्रत्येकाने किमान एक तास स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करायचा आणि त्या केलेल्या अभ्यासावर चर्चा घडवून आणायची आणि विषय समजून घ्यायचा अशा प्रकारचे प्रयोग आपण या शिबिरादरम्यान करणार आहोत.

तसेच आपल्याच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी कुमार शिंदे याची राष्ट्रीय स्तरावर सांस्कृतिक मधून निवड झाली आहे. अशा प्रकारचे अनेक विद्यार्थी अशा शिबिरातून घडतील असा अशावाद आहे.

मा. मुकुंदशेठ शहा (सचिव, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ)



*संस्थचे सचिव मा. मुकुंदशेठ शहा स्वयंसेवकांना संबोधित करताना*

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांच्या व्याक्तीमत्व विकास घडवून आणतानाच त्यांच्या मध्ये सामाजिक भान निर्माण करून समाजविकास करण्यासाठी रा.से.यो. च्या अनुषंगाने आपले महाविद्यालय अनेक उपक्रम स्वयंसेवकांसाठी घेत असते. दरवर्षी एन एस एस शिबिर होत असते पण यावेळी थोडेसे वेगळे काम आपण करणार आहोत. त्याचे ३१ पॅरामिटर आहेत हे वेगळे शिकण्याची संधी आपणाला मिळतेय याचा आम्हाला आनंद आहे.

दरवर्षी शिक्षण, खेळ, सांस्कृतिक, इत्यादी क्षेत्रामध्ये आपल्याला काय काय नविन मिळविता येईल यासाठी संस्थेचा आग्रह व पांठींबा असतो. शिक्षक, विद्यार्थी या प्रक्रियेतून घडत आहे याचा मला आनंद आहे.

“शिबिर हे रा.से.यो. चा गाभा आहे. युवकांमध्ये नेतृत्वगुण, साहित्यीक गुण, सांघिक व खिलाडुवृत्ती निर्माण करणे हा या शिबिर घेण्यामागचा मुख्य हेतु असतो. शिबिर स्थळांवर असणारे विविध प्रश्न सोडवण्यापासुन ते सामाजिक समस्या जानून प्रबोधन करण्यासाठी व श्रमसंस्कार शिकणे व शिकविण्यासाठी या शिबिराचे आयोजन होत असताना मला अत्यंत आनंद होत आहे. या भागाच्या विकासासाठी विद्यार्थ्यांच्या मदतीने अनेक समाज उपयोगी कामे होतील असा आशावाद मला वाटतो.

समस्यांचे सर्वेक्षण होवून विश्लेषण केलेला अहवाल सामाजिक समस्या सोडविण्यासाठी उपयोगी पडेल. असे महत्वपूर्ण कार्य या शिबिराच्या माध्यमातून होईल. माझे सर्व स्वयंसेवक विद्यार्थी व प्राध्यापक बंधुभगीनी कार्यरत राहतील व गावच्या

विकासाला दिशा देण्याचे व छोटया प्रमाणात का होईना पण विकास कामे करण्याचा प्रयत्न करतील.''

शिबिरातून होणा-या श्रमदानाला अधिक महत्व आहे. विद्यार्थ्यांनी श्रमदानातून अधिक वृक्षलागवड करून पर्यावरण संतुलनासाठी हातभार लावल्यानंतर जे समाधान मिळते त्याला तोड नाही. सांघिककार्यातून, सामाजिक भावना तयार होते. ग्रामिण भागात जीवन जगत असताना येणा-या भविष्यात कितीही संकटे आली तरी महाविद्यालयातील विद्यार्थी हा संकटांना न डगमगता धैर्याने व आत्मविश्वासाने सामोरे जाईल असे स्वयंसेवक तयार आणि या इतर महाविद्यालये एकत्र येवून खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तयार करणारे हे शिबिर आहे.

सक्षम युवा समर्थ भारत व विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या या सात दिवसाच्या शिबिर कालावधीमध्ये या सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक माळवाडी नं. २ या गावात श्रमदान करण्यासाठी, ग्रामस्वच्छता करण्यासाठी आणि वृक्षारोपण करण्यासाठी झटतील व या माळवाडी गावाचा विकास करण्यासाठी हातभार लावतील. आय् कॉलेज नेहमीच विधायक काम करत असताना आपणास पहावयास मिळते.

मी विद्यार्थी असताना राष्ट्रीय सेवा योजनेची विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये देखील सहभाग घेतला आहे. अशी श्रमसंस्कार शिबिरे युवकांना श्रमदानाचा संदेश देत असतात. अशा श्रमदानामधूनच गाव तालुका, जिल्हा, राज्य, देश सक्षम होत असतो. राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती व समाजासाठी काम करण्याची प्रेरणा व आस या शिबिरामधुन मिळते.

पुढच्या सात दिवसात रा से यो चे स्वयंसेवक माळवाडी या गावातील शिक्षणाचे स्वरूप, व्यवसाय, उदरनिर्वाहाची साधने, गावातील समस्या इत्यादीचा अभ्यास करून त्यावरील उपाय योजना सुचवतील याची मला खात्री आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककामध्ये सहभागी असणारे स्वयंसेवक हे सामाजिक भान असणारे असतात. त्यांना सेवेचे महत्व समजलेले असते. त्यामुळे सेवेची भावना व महत्व ते आपल्या आजुबाजुला रूजविण्याचे काम करतात. अशा सेवाभावनेच्या

रूजूवातामुळे चैतन्य निर्माण होत असते. अशा चैतन्य निर्माण करण्याची क्षमता या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये असलेली आपणास पहावयास मिळते.

अशा प्रकारे या उद्घाटन प्रसंगी उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांनी अतिशय सुंदर पध्दतीने राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना आणि उपस्थित सर्व माळवाडी नं. २ मधील ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

डॉ. गजानन कदम यांनी उपस्थित असलेल्या सर्व पाहुण्यांचे आणि माळवाडी नं. २ मधील ग्रामस्थांचे अभार मांनले.

## उद्घाटन समारंभातील काही अविस्मरणिय क्षण



















## स्वयंसेवकांची ओळख

उद्घाटनाचा कार्यक्रम संपल्यानंतर सर्व स्वयंसेवकांना चहा देण्यात आला. आणि त्यानंतर सर्व स्वयंसेवकांना एकत्र करण्यात आले व त्यांना कार्यक्रम अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. सर्व स्वयंसेवकांना विविध प्रकारच्या सूचना देण्यात आल्या शिबिरातील विविध कार्यक्रमाविषयी विविध कामांविषयी तसेच शिबिरामध्ये आपण काय करणार आहोत अशा प्रकारच्या विविध घटकांविषयी सूचना व माहिती देण्यात आली.




सर्व स्वयंसेवकांना विविध सूचना दिल्यानंतर ओळख करून देणे व एक मेकांची ओळख करून घेणे अशा प्रकारचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये प्रत्येक स्वयंसेवकानं सर्वांपुढे येवून आपले स्वत:चे नाव, महाविद्यालयाचे नाव, आवडता छंद, मिळालेले गुण/_पारितोषिके / मिडल अशा विविध प्रकरची माहिती सांगून स्वत:ची ओळख करून घेण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमामध्ये सर्व स्वयंसेवकांनी आपली विविध भाषांमध्ये ओळख करून दिली. उदा. हिंदी, इग्लिश, मराठी या भाषांमध्ये ओळख करून दिली.

आणि अशा प्रकारे माळवाडी या गावातील शिबिराचा पहिला दिवस अतिशय सुंदर आणि चांगल्या प्रकारे पार पडला.

# शिबिराचा दुसरा दिवस

# प्रार्थना व कवायत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर आयोजित सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन समारंभ झाल्यानंतर दुसऱ्या दिवसाची सुरूवात झाली. दि. ०४ जानेवारी २०२० या दिवशी पहाटे ०४.०० वाजल्यापासूनच स्वयंसेवकांची गजबज सुरू झाली. व शिबिराच्या पहिल्या दिवशी दिलेल्या सूचनेनूसार व नियमांप्रमाणे व नियमाचे अतिशय काठेकोर पणे पालन करत सर्व स्वयंसेवक योगा करण्यासाठी सकाळी ६.०० वा. माळवाडी नं.२ येथील गणेश मंदिर या ठिकाणी उपस्थित राहिले. सकाळी ६.०० ते ७.३० या वेळेमध्ये प्रभात प्रार्थनेचे नियोजन करण्यात आलेले होते. प्रत्येक गटाकडुन या काळात खालील गोष्टी करून घेण्यात आल्या.




*योगा करताना शिबिरातील स्वयंसेवक*

१)योगा करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक

२) प्रार्थना – खरा तो एकची धर्म, हम होंगे कामयाब, इतनी शक्ती हमे देना दाता

३) पसायदान

D.R. Typing

४) दिनविशेष

५) रा.से.यो.गीत

६) विद्यापीठगीत

७) सुविचार

८) देशभक्तीपर गीत

९) पसायदान

१०) राष्ट्रगीत





*योगा करताना शिबिरातील स्वयंसेवक*

ही योगासने करत असताना स्वयंसेवकांना ३०व्यायामांचे प्रकार शिकविण्यात आले व त्यांच्या कडून ते करून घेण्यात आले. आणि अशा प्रकारच्या व्यायामांचे आणि योगासनांचे भविष्यात कशा प्रकारे फायदा होवू शकतो. कोणत्या प्रकारच्या आजारापासून आपण आपला बचाव करू शकतो अशा विविध प्रकारच्या व्यायामाच्या आणि योगासनांची शरिरासाठी कशा प्रकारे जडघडण होत आसते अशा प्रकारच्या ज्ञानाची भर त्याच्याकडे देण्यात आली.

सर्व प्रकारचे योगासने आणि व्यायाम झाल्यानंतर योगाचा कार्यक्रमाचा राष्ट्रगीताने शेवट करण्यात आला. व स्वयंसेवकांना चहा व नाष्टा करण्यासाठी परवानगी दिली. नाष्टा, चहा, आणि जेवण बनविण्याचे काम आणि आज दिवसभरातील विविध मेसमधील कामे ही ठरल्याप्रमाणे ग्रुप क्र २ नर्मदा या ग्रुप कडे होती. नर्मदा या ग्रुप ने अतिशय सुदंर अशा प्रकारच्या नाष्टयाची सोय केलेली होती. शिबिरामधील सर्व स्वयंसेवकांनी चहा व नाष्टा केल्यानंतर बरोबर ठिक ८.०० वा. जैवविविधता सर्वे साठी सर्व स्वयंसेवकांनी इंदापूरकडे प्रस्थान केले.

**लोक जैवविविधता सर्वेक्षण**

लोक जैवविविधता याचा साधा सरळ अर्थ म्हणजे लोकांनी निर्माण केलेली जैवविविधता होय. लोक विविधते अगोदर समजून घेवून जैवविविधता म्हणजे त्या त्या भागामध्ये असणारे कृमी, किटक ते मोठे मोठे वृक्ष यामध्ये असणारी विविधता आणि यासर्वांचे एकमेकांवर असलेले परस्परांवलंबन किंवा सहजिवन लोकजैवविविधतेची संकल्पना घेवून इंदापूर शहरातील जैवविविधता समजून घेण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी विशेष शिबिरातील स्वयंसेवकांनी लोकजैवविविधता सर्वे आयोजित केला यासाठी सहा गट निर्माण करण्यात आले. प्रत्येक गटासोबत एक प्राध्यापक देण्यात आला आणि प्रत्येक गटाला एक प्रश्नावली देण्यात आली त्या प्रश्नपत्रिकेमध्ये ३० पॅरामिटर (घटक) आहे. उदा. पिक वनस्पती घेतली तर ही सर्व माहिती गोळा करावयाची आहे. यामध्ये पिक वनस्पतीचे शास्त्रीय नाव स्थानिक नाव, प्रकार, अधिवास, लागवडीखालील अंदाजे क्षेत्र, स्थानिक स्थिती (पूर्वीची –आताची) त्यांची गुणवैशिष्टये पिक घेण्याचा हंगाम पारंपारिक माहिती ज्ञान, उपयोग बियाणे, रोपे, स्त्रोत, माहिती असणारी व्यक्ती इत्यादी पॅरामिटरची माहिती घेतली जाते. जेणेकरून वनस्पतींविषयी सर्व माहिती आपणास होते. शास्त्रीय पद्धतीने एखादया वनस्पतीचे बीजारोपण ते उपयोग ही सर्व माहिती व ज्ञान आपणास होते. यामुळे ती वनस्पती संवर्धीत करण्यासाठी व त्यामध्ये वृद्धी करण्यासाठी निश्चितच मदत होते आणि जैवविविधता टिकण्यास आणि वाढविण्यास हातभार लागतो. त्याचबरोबर आपल्या इंदापूर शहरात कोणत्या प्रकारची जैवविविधता आहे. आणि

कोणत्या प्रकारची नाही ती कशा प्रकारे निर्माण करता येईल त्यासाठी काय उपाय योजना कराव्या लागतील यासाठी अशा अभ्यासाची नक्कीच मदत होईल.

### १) फळझाडे

शास्त्रीय नाव, स्थानिक नाव, प्रकार अधिवास, स्थानिक स्थिती (पूर्वीची—आताची) बिज/रोपटयाचा स्त्रोत, फळे धरण्याचा हंगाम संबधित फळझाडाविषयी पारंपारिक माहिती किंवा ज्ञान, त्याचा वापर यामध्ये स्वत:साठी किंवा विकण्यासाठी, त्याची माहिती असणारी व्यक्ती. इत्यादी माहिती सर्वेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी गोळा केली.

### २) गुरांच्या चाऱ्यांचे पिक / जाती.

शास्त्रीय नाव, स्थानिक नाव, प्रकार अधिवास, स्थानिक स्थिती (पूर्वीची—आताची) बिज/रोपटयाचा स्त्रोत, चाऱ्याचे पिक याविषयी पारंपारिक माहिती किंवा ज्ञान, वापरात येणारा भाग त्याची माहिती असणारी व्यक्ती. इत्यादी माहिती सर्वेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी गोळा केली.

### ३) तणप्रजाती

शास्त्रीय नाव, स्थानिक नाव, प्रकार अधिवास, स्थानिक स्थिती (पूर्वीची—आताची) तण याविषयी पारंपारिक माहिती किंवा ज्ञान, स्वदेशी व विदेशी तण आणि त्याच्या व्यवस्थापनाचा पर्याय त्याची माहिती असणारी व्यक्ती. इत्यादी माहिती सर्वेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी गोळा केली.

### ४) पिकांवरील किड

पोशिंदा / किटक / प्राणी यांचे शास्त्रीय नाव, स्थानिक नाव, प्रकार अधिवास, आक्रमणाची वेळ, हंगाम, व्यवस्थापनतंत्र माहिती असणारी व्यक्ती. उदा. मावा, किटक कोणत्या पिकांवर पडतो तो कोणत्या कालावधीत पडतो त्याच्यावर कोणती उपाय योजना केली पाहिजे इत्यादी माहिती सर्वेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी गोळा केली.

### ५) पाळीव प्राणी / विक्रीसाठी बाजार

बजाराचे नाव, स्थळ, बाजाराचे स्वरूप साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, सहामाही, वार्षिक इत्यादी तसेच विकले किंवा घेतले जाणारे प्राणी, देवाण घेवाण होणाऱ्या प्राण्याची सरासरी, प्राण्याचे आणण्याचे ठिकाण, विक्रीचे ठिकाण व त्यानंतर प्रत्यक्ष पोहचण्याचे ठिकाण इत्यादी.

### ६) मासे बाजार

बाजाराचे नाव, स्थळ, माशांचे प्रकार, मासे प्राप्त होणारे स्थळ इत्यादी.

### ७) लोकजीवन

जातीसंख्या, कुटूंब आणि व्यवसाय, उपव्यवसाय, अधारीत भूस्वरूप, मुख्य संसाधनाची उपलब्धता, उपलब्धीचा हंगाम भूमिरचना व्यवस्थापन पद्धती, जात, जमात, सामिजिक स्थिती, रहीवासाचा प्रकार, घरांची संख्या इत्यादी माहिती मिळवली.

### ८) भूमिरचना

प्रमूख भूमी यामध्ये शेतजमिन, तळे, पडिक जमिन इत्यादी विविरणासह, उपभूमी स्वरूप यामध्ये काळी, तांबडी, खडकाळ, इत्यादी मृदे मधील विशेष घटक, अंदाजे क्षेत्र, स्वत:ची व सार्वजनिक मालकी सर्वसाधारण कोणती पिके घेतली जातात, कोणत्या वनस्पती उगवतात, कोणत्या प्राण्यांचा वावर आहे. त्याभूमिचा वापर कोण करते यामध्ये नागरिक प्राणी की अन्य इत्यादी माहिती मिळवली.

### ९) पाणी उपलब्धतेचा प्रकार

पाणी उपलब्ध कसे होते यामध्ये विहीरीद्वारे, हपश्याद्वारे की अन्य प्रकारे या सर्वांचा आकार त्याचबारोबर यावर मालकी कोणाची व्यक्तीची, गावाची, शासनाची, या पाण्याचा वापर शेतीसाठी, पिण्यासाठी कि उद्योगासाठी नक्की कशासाठी केला जातो. वापर करणार गट कोण आहे. त्याचे व्यवस्थापन कसे केले जाते. इत्यादी माहिती मिळविली.

## १०) मृदेचे प्रकार

मृदा प्रकार काळी, चिकण, तांबडी पांढरी इत्यादीचा समावेश मृदा प्रकारात होतो. मृदेचा रंग आणि पोत, मृदेत विशेष घटक, मृदा व्यवस्थापन, त्यामृदेत येणारी वनस्पती आणि पिके तसेच मृदा प्रकारानुसार आढळणाऱ्या वनस्पती प्राणी आणि प्रजाती इत्यादीची माहिती मिळवीली.

## ११) वैद्यकीय वनस्पती/ जडीबूटी

वनस्पतीचे शास्त्रीय नाव, स्थानिक नाव, प्रकार अधिवास, हंगाम, व्यवस्थापनतंत्र माहिती असणारी व्यक्ती. इत्यादी माहिती घेतली.

## १२) शोभेच्या वनस्पती

वनस्पतीचे शास्त्रीय नाव, स्थानिक नाव, प्रकार अधिवास, हंगाम, व्यवस्थापनतंत्र इत्यादी माहिती घेतली. तसेच व्यापारी / अव्यापारी, शोभेसाठी, नर्सरी इत्यादी विषयी पारंपारिक व आताची माहिती असणारी व्यक्ती त्यांच्याकडून माहिती मिळविली.

## १३) इमारती लाकडांची रोपे / झाडे

झाडांचा प्रकार स्थानिक नाव, शास्त्रीय नाव, प्रकार अधिवास, हंगाम, व्यवस्थापनतंत्र अशी झाडे नक्की कोठे येतात यामागे रानटी, नर्सरी की, बगीच्यात त्याचबरोबर त्याचा वापर कसा होतो. इत्यादी माहिती असणाऱ्या व्यक्ती सोबत चर्चा करून माहिती मिळविली.

## १४) पाळीव प्राणी

पाळीव प्राण्याचे प्रकार, स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, प्रकार अधिवास, त्या प्राण्यांची पैदास (स्थानिक, मिश्र ) गुणवैशिष्टये पाळण्याची पद्ध, (मुक्त गोठा / बंदिस्त) स्थानिक स्थिती उपयोग संबधित प्राण्याविषयी ज्ञान, व्यापारी कारणासाठी पालन, माहिती असणारी जात, जमात, व्यक्ती इत्यादी.

**१५) संवर्धीत मत्स्य पालन**

माशाचा प्रकार, स्थानिक नाव, शास्त्रीय नाव, प्रकार गुणवैशिष्टये, जलसंचय (तलाव, नदी, धरण) स्थानिक अवस्था घरगुती की व्यापारी कारणासाठी वापर इत्यादी.

**१६) पाळीव प्राणी / वैद्यकीय वनस्पती आणि इतर उत्पादनासाठी बाजार आणि जत्रा**

पाळीव प्राण्यासाठी बाजार/जत्राः स्थळ, साप्ताहीक, पाक्षिक, मासिक, सहामाही, वार्षिक

वैद्यकीय वनस्पती : स्थळ, साप्ताहीक, पाक्षिक, मासिक, सहामाही, वार्षिक

इतर उत्पादन : आठवडे बाजार

**१७) झाडे, झुडूप, जडीबुट्टी, वेल इत्यादी प्रजाती**

वनस्पतीचा प्रकार : स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, सवयी, स्थानिक स्थिती व्यापारी करणासाठी की स्वत:साठी, अधिवास, गोळा केलेला भाग यामध्ये पान, फुल, फळ, मुळी, फांदी इत्यादी माहिती गोळा केली.

**१८) महत्वाच्या वन्य वनस्पतीच्या जाती.**

वनस्पतीचा प्रकार : स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, सवयी, स्थानिक स्थिती व्यापारी करणासाठी की स्वत:साठी, अधिवास, गोळा केलेला भाग यामध्ये पान, फुल, फळ, मुळी, फांदी इत्यादी माहिती गोळा केली. आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक महत्व सद्यस्थिती.

**१९) वन्य प्राणी प्रजाती**

स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, प्रकार गुणवैशिष्टये अधिवास उपयोग इत्यादी माहिती.

## २०) जलचर वन्य वनस्पती

स्थानिक नाव, शास्त्रीय नाव, प्रकार, महत्व, नविन कलपद्धती इत्यादी.




शिबीरातील स्वयंसेवकांना लोक जैवविविधता सर्वे विषयी मार्गदर्शन करताना
प्रा. दर्शन दळवी व प्रा. अविनाश सुर्यवंशी

## २१) औषधी महत्व असलेल्या वन्य वनस्पती

स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, प्रकार गुणवैशिष्टये अधिवास स्थानिक स्थिती पारंपारिक माहिती उपयोग वापरात येणारा भाग, उपयोग व्यक्तीगत किंवा व्यापारी, माहिती असणारी व्यक्ती जमात इत्यादी.

## २२) पीक प्रजातीच्या रानटी मूलप्रजाती

स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, संबधित पीक, भूमी, स्थानिक अवस्था (पूर्वीची – अताची) उपयुक्त भाग, उपयोग, माहिती असलेली व्यक्ती जमात इत्यादी.

## २३) शोभेच्या वनस्पती

स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, संबधित पीक, भूमी, स्थानिक अवस्था (पूर्वीची – अताची) उपयुक्त भाग, उपयोग, माहिती असलेली व्यक्ती जमात इत्यादी.

## २४) वाफरणी / धुरी द्यायचे / चघळायच्या वनस्पती प्रजाती

वनस्पती जडीबुटी, झुडपे, झाडे इत्यादी चे स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, प्रकार अधिवास, भूमी, स्थानिक अवस्था (पूर्वीची – अताची) उपयुक्त भाग, उपयोग, माहिती असलेली व्यक्ती जमात इत्यादी.

## २५) इमारती लाकुड वृक्ष प्रजाती

झाडे इत्यादी चे स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, प्रकार अधिवास, भूमी, स्थानिक अवस्था (पूर्वीची – अताची) उपयुक्त भाग, उपयोग, माहिती असलेली व्यक्ती जमात इत्यादी.

## २६) वन्य प्राणी

सस्तन प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी, उभयचर इत्यादी प्रजाती स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, प्रकार अधिवास, वर्णन काळा, पांढरा, इत्यादी हंगाम स्थानिक अवस्था (पूर्वीची – अताची) उपयुक्त भाग, उपयोग, शिकर करण्याची पध्दत माहिती असलेली व्यक्ती जमात इत्यादी.

## २७) वनस्पती प्रजाती

शाास्त्रीय नाव, प्रकार अधिवास, फुले धरण्याचा हंगाम, उपलब्धत (कमी, जास्त)

## २८) प्राणी प्रजाती

स्थानिक नाव, शाास्त्रीय नाव, प्रकार गुणवैशिष्टये अधिवास उपयोग इत्यादी माहिती. सस्तन प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी, उभयचर इत्यादी प्रजाती बद्दलची माहिती.

## २९) स्थानिक महत्वाची माहिती

स्थानिक महत्वाची यामध्ये फिल्टर, स्वच्छता, वृक्षरोपण इत्यादी जैवविधतेच्या दृष्टीने महत्वाची माहिती.

## दुपारचे सत्र

इंदापूर या ठिकाणाहून सर्वे करून आल्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी जेवणाचा अस्वाद घेतला व जेवणानंतर आराम करून लगेच इंदापूर —माळवाडी— शिंगाडे वस्ती कडे जाणारा मुख्य रस्ता ग्रुप नुसार स्वच्छ करण्याचे काम सर्व ग्रुपने हाती घेतले. या दरम्यान सर्व ग्रुपसाठी एक — एक प्राध्यापक देण्यात आला व त्या सर्व ग्रुपला १०० मीटर ऐवढे अंतर स्वच्छ करण्यास दिले.





यादरम्यायन सर्व स्वयंसेवकांना सांगण्यात आले की जो ग्रुप अतिशय चांगली आणि सुदंर स्वच्छता करेल त्या ग्रुपचा नंबर काढला जाईल किंवा तो ग्रुप अतिशय चांगले काम करतो असे घोषित केले जाईल. आशा विविध प्रकारच्या सूचना या स्वयंसेवकांना दिल्यायनंतर सर्व स्वयंसेवकांना एक समान साहित्य देण्यात आले. ते म्हणजे प्रत्येक ग्रुप ला १ टिकाव, १ खोरे, ५ खराटे, ५ घमेली, अशा प्रकारचे विविध प्रकारचे साहित्य त्यांना देण्यात आले व स्वछता करण्यास स्वयंसेवक सज्ज झाले आणि स्वच्छतेस सुरूवात झाली.





माळवाडी गावातील स्वच्छते पूर्वीची काही छायाचित्रे

गवत, कचरा, प्लास्टिक, काटेरी झुडपे तसेच झाडांच्या रस्त्यावर येणाऱ्या फांद्या काढून त्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. यादरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांचे केलेल्या विविध ग्रुपने ही स्वच्छता अतिशय मन लावून केली.





माळवाडी गावातील रस्ते स्वच्छ करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक

D.R. Typing



माळवाडी गावातील रस्ते स्वच्छ केल्यानंतरचे छायाचित्र

या श्रमदानानंतर चहा देण्यात आला व स्वयंसेवकांना पथनाटय करण्यासाठी वेळ देण्यात आला. व रात्री भोजनानंतर विश्रामासाठी सर्व स्वयंसेवक गेले.

## काही अविस्मरणिय क्षण














D.R. Typing

# शिबिराचा तिसरा दिवस

# कवायत व प्रार्थना

पहाटेची करोनिया तयाचे आसन! बुद्धी होईल तीक्षण!! या ओवीप्रमाणे नियोजनानुसार योगासनाने स्वयंसेवकांनी आपल्या दिनक्रमाची सुरूवात सकाळी केली. प्रा. फिरोज शेख यांनी योगासनाचे महत्व सांगितले ते म्हणाले ‘जीवनात चांगले आरोग्य□हि आनंदी जीवन निर्माण करते म्हणून योगासनाचा अभ्यास व प्रात्यक्षिक शिकणे आवश्यक आहे. प्रा. फिरोज शेख यांनी स्वयंसेवकांकडून योगासने करून घेतली. त्यानंतर अल्पोहार घेतल्यानंतर स्वयंसेवकांच्या निर्माण केलेल्या ग्रुप नुसार स्वयंसेवकांसोबत सर्व प्राध्यापक, कर्मचारी माळवाडी गावाच्या परिसरामध्ये ग्राम स्वच्छता करण्यासाठी पुढील सहा गट बाहेर पडले व सिंधू हा गट स्वयंपाकासाठी शिबिरास्थळी राहीला. १) गोदावरी २) नर्मदा ३) कृष्णा ४) भिमा ५) कावेरी ६) निरा

या सर्व स्वयंसेवकांनी माळवाडी नं. २ या गावामध्ये प्रभात फेरी काढली व गावामधील लोकांना स्वच्छतेची आणि लोक जैवविविधतेबाबत जागृती करत गावातून फेरी काढली.



प्रभात फेरी काढलेला क्षण

D.R. Typing

या सर्व ग्रुपमधील स्वयंसेवकांनी गावातील परिसर स्वच्छ करण्याचे एक महत्वपूर्ण काम या शिबिरातील स्वयंसेवकांनी केले आहे.





**स्वच्छता करतानाचे फोटो.**

सर्व रस्ते झाडून स्वच्छ केले त्याचबरोबर रस्त्यावर असणारी काटेरी झुडपे तोडून स्वच्छता केली. हे स्वच्छतेचे काम करत असताना गावक—यांचा सहभाग ही अतिश्य महत्वपूर्ण ठरला. माळवाडी नं. २ गावातील ग्रामस्थ अतिशय हीरीरीने स्वच्छतेच्या कामात स्वयंसेवकांना सहकार्य करत होते. काम करत असताना लागणारे साहीत्य उदा. कुऱ्हाड इत्यादी पुरवत होते. त्यामुळे काम करणे अधिक सोईचे झाले. गावातील अनेक लोकांच्या घराशेजारचा परिसर स्वच्छ करत असताना ते स्वयंसेवकांना सहकार्य करू लागत त्याचबरोबर त्यांना अवश्यक असणाऱ्या साहीत्यांची पुरवणी करत असत.





अशा पध्दतीने स्वयंसेवक आणि गावाातील ग्रामस्थांनी मिळून अतिशय सुंदर आणि चांगल्या प्रकारे स्वच्छता करण्यात आली.




**माळवाडी नं.२ गावातील स्वच्छता करतानाचा क्षण**

अशा प्रकारे सकाळच्या सत्रामध्ये सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी अतिशय चांगल्या प्रकारे स्वच्छता केली आणि यानंतर सर्व स्वयंसेवकांना दुपारच्या भोजनाचा अस्वाद घेण्यासाठी पाठविण्यात आले.

## दुपारचे सत्र

शिबीरातील सर्व स्वयंसेवकांनी जेवणाचा अस्वाद घेतल्यानंतर त्यांना २ ते ३.३० पर्यंत विश्रांतीसाठी वेळी दिली आणि त्यानंतर बरोबर ३.४५ ला प्रा. नामदेव पवार यांचे मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. नामदेव पवार यांचा विषय हा अतिशय चांगला होता अशा विषयातून नक्कीच तरूनांना भविष्यकालीन व उदनिर्वाहची संकल्पना यातून स्पष्ट होताना दिसते. प्रा. नामदेव पवार यांनी अतिशय चांगल्या आणि सुंदर शैलित गांधी विचारांची गरज या विषयावर मार्गदर्शन करण्यास सुरूवात केली अतिशय चांगल्या प्रध्दतीने त्यांनी आपले विचार मांडले.



प्रा. नामदेव पवार शिबीरातील स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना

प्रा. नामदेव पवार यांनी महात्मा गांधी विचाराची प्रासंगिकता या विषयावर मार्गदर्शन करत असताना राष्ट्रीय सेवा योजना व गांधी यांच्यातील सहसंबधाची मांडणी केली. गांधीकडे पाहण्याचा जागतिक संदर्भ व भारतीय संदर्भ याचा आढावा घेऊन पुढील मुद्याद्वारे गांधी विचारांची प्रासंगिकता स्पष्ट केली. हिंदु मुस्लिम ऐक्य व गांधी विचार या मुद्यावर बाबरी ते दादरी, आताचा नागरिकत्व दुरूस्ती कायदा या घटने अधारे हिंदु मुस्लिम प्रश्नांचा वेध घेत हा प्रश्न सोडविण्यासाठीचा लढा उभा रहावयाचा असेल तर गांधी विचारातील सर्व धर्म समभावाची दृष्टी आपण घेतली पाहीजे. कारण महात्मा गांधींनी अनेक आश्रमे उभी केली पण कोणत्याही आश्रमामध्ये मंदीर बांधले नाही इतकेच नव्हेतर आश्रमात होणारी प्रार्थना सुध्दा सर्वधर्म समभावाची होती. भारत पाकिस्तान फाळणीनंतर हिंदु मुस्लिम दंगली उसळल्या त्याविरोधात गांधीनी उपोषण करून दंगली थांबविल्या. उदा. नवखली. हिंदु मुस्लिम ऐक्यासाठी स्वत:चा जीव पणाला लावणारे गांधी व आजचे राज्यकर्ते यांच्यातील फरक समजाऊन सांगितले.

अस्पृश्यता / जात व महात्मा गांधी याबाबत मांडणी करताना स्पष्ट केले की अस्पृश्यावरचे हल्ले, नग्नधिंड, पाणवटा, स्मशानभूमी, इत्यादीवरून जातीय दंगली ही

नित्याचीच कायमस्वरूपी बातमी आहे. त्याच बरोबर खैरलांजी ते कोपर्डी या प्रकरणाला लागलेले जाती वळण, जातीय मोर्चांची सुरू असलेली स्पर्धा, गाडीवर जातीय स्टिकर लावण्याची स्पर्धा. महापुरूषांना जातीत बधिस्त करण्याची समाज विघातक पध्द्त यावर प्रकाश टाकत यातून बाहेर पडण्यासाठी गांधी विचाराची प्रस्तूतता स्पष्ट केली. कारण गांधीजींच्या मते जात ही समाज रचनेबरोबरच मानसिकता आहे. त्यामूळे मानसिकता बदलणे गरजेचे आहे. गांधीजी म्हणत की भारतीय समाजावरील अस्पृश्यता सर्वात मोठा कलंक आहे. जातीय मानसिकतेतून बाहेर पडून महापुरूषांचा मानवतावादी विचार समाजामध्ये रूजवणे हे स्वयंसेवकांचे काम आहे.





स्त्री प्रश्न आणि गांधी विचार या प्रश्नाबाबत मत मांडताना स्पष्ट केले की आज भारतातील दर तीसरी महिला कुपोषीत व दर दुसरी महिला ॲनिमीया ग्रस्त आहे. पोलिस रेकॉर्ड नुसार दर दोन मिनिटाला स्त्रीवर अत्याचार होतो. स्त्रीभृणहत्या, ऑनरकिलींग इत्यादी त्याचबरोबर लैंगिक शोषनात महाराष्ट्र तीस—या स्थानावर आहे. यावर गांधी विचाराची मात्रा म्हणजे ब्रम्हचर्यवृत्त पालन व स्त्री पुरूष निखळ संबंधावर गांधीनी दिलेला भर होय. येथील पुरूषांनी मानसिकता बदलली पाहीजे त्याचबरोबर उपस्थित सर्व मुलींनी रक्षाबंधन दिवशी आपल्या भावाकडून एक अश्वासन घ्यावे कि तो कोणत्याही मुलीकडे वाईट नजरेने पाहणार नाही.

अशा प्रेरणादायी सूचना देत आणि थोडक्यामध्ये महाराजांचा इतिहास सांगत त्यांनी त्याच्या व्याख्यानाची सांगता केली.

आणि अशा प्रकारची प्रेरणादायी व्याख्याने झाल्यानंतर सर्व स्वयंसेवक चहासाठी गेले.

यानंतर ६ ते ८ या वेळेमध्ये श्रमसंस्कार शिबीरामध्ये पाडलेल्या प्रत्येक ग्रुप ने पथनाटय सादर करावयाचे असे त्यांना सांगण्यात आले आणि त्यामधील सर्वच गटांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पथनाटयाचे विषय देखील अतिशय ज्वलंत निवडलेले होते यामध्ये दारू बंदी, वृक्ष संवर्धन, मतदान जनजागृती, ओला कचरा, सुखा कचरा इत्यादी विषयाच्या माध्यमातून पथनाटय सादरीकरण करण्यात आले. सदर पथनाटयाच्या कार्यक्रमास माळवाडी गावातील ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला.





*पथनाटय सादर करताना शिबीरातील स्वयंसेवक*

या कार्यक्रमानंतर शिबीरातील सर्व स्वयंसेवक भोजनाचा स्वाद घेण्यासाठी माळवाडी गावातील श्री. गणेश मंदिर या ठिकाणी आले आणि त्यांनी सुंदर अशा भोजनाचा अस्वाद घेतला. यानंतर सर्व स्वयंसेवक झोपण्यास गेले.

# अविस्मरणीय क्षण











D.R. Typing












D.R. Typing

# शिबिराचा चौथा दिवस

# कवायत व प्रार्थना

दि.०३ ते ०९ जानेवारी दरम्यान च्या काळामध्ये सकाळी ६.०० ते ७.३० या वेळेमध्ये प्रभात प्रार्थनेचे नियोजन करण्यात आलेले होते. प्रत्येक गटाकडून या काळात खालील गोष्टी करून घेण्यात आल्या.

१)योगा करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक



२) प्रार्थना – खरा तो एकची धर्म, हम होंगे कामयाब, इतनी शक्ती हमे देना दाता





*D.R. Typing*

३) पसायदान

४) दिनविशेष

५) रा.से.यो.गीत

६) विद्यापीठगीत

७) सुविचार

८) देशभक्तीपर गीत

९) पसायदान

१०) राष्ट्रगीत

नियोजनानुसार योगासनाने स्वयंसेवकांनी आपल्या दिनक्रमाची सुरूवात सकाळी केली. प्रा. फिरोज शेख यांनी योगासनाचे महत्व सांगितले ते म्हणाले 'जीवनात चांगले आरोग्य□हि आनंदी जीवन निर्माण करते म्हणून योगासनाचा अभ्यास व प्रात्यक्षिक शिकणे आवश्यक आहे. डॉ. गजानन कदम यांनी स्वयंसेवकांकडून योगासने करून घेतली.





त्यानंतर अल्पोहार घेतल्यानंतर स्वयंसेवकांच्या निर्माण केलेल्या ग्रुप नुसार स्वयंसेवकांसोबत सर्व प्राध्यापक, कर्मचारी इंदापूर परिसरामध्ये लोक जैवविविधतेचा सर्वे करण्यासाठी पुढील सहा गट गेले.

१) गोदावरी २) नर्मदा ३) सिंधु ४) भिमा ५) कावेरी ६) निरा

या सर्व ग्रुपमधील स्वयंसेवकांनी इंदापूर मधील परिसरात अतिशय चांगल्या पध्दतीने सर्वे केला. सर्व स्वयंसेवक आणि प्राध्यापक यांनी इंदापूर शहरातील सोनाईनगर, आंबिकानगर भाग १ व भाग २, खडकपूरा, बाजारपेठ, मेन रोड ते नेहरू चौक, शहा सांस्कृतिक भवन ते दत्त नगर, सावतामाळी नगर, आंबेडकर नगर, कसबा, रामवेस, व्यकंटेशनगर, श्रीरामसोसायटी, सरस्वतीनगर, राजेवलीनगर, महतीनगर, राधिकानगर, या परिसरात लोकजैवविविधता नोंदणीसाठीचे सर्वेक्षण केले. सर्वेक्षणादरम्यान स्वयंसेवकांनी विविध प्रजातींची झाडे, झुडपे, वेली, व शोभेच्या वनस्पती आणि विविध पाळीव प्राण्यांची शास्त्रीय नावे प्लान्ट नेट या मोबाईल ॲपच्या मदतीने माहिती घेतली तसेच इतरही सामाजिक व सांस्कृतिक घटकांची माहिती मिळविली.





लोक जैवविविधता सर्वेक्षण करतानाचे क्षण

इंदापूर शहरात इंदापूर नगरपरिषदेने निर्माण केलेल्या ''अटल धनवन'' या जैवविविधता हॉट्स्पॉट या ठिकाणाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सर्वेक्षण करण्यासाठी भेट देवून सर्वेक्षण केले. याठिकाणी सुमारे २४ प्रकारच्या विविध वन्य

वनस्पती, औषधी वनस्पती, व इतर वनस्पतींची वृक्षारोपण केले आहे. स्वयंसेवकांनी या परिसरातील विविध वनस्पतींच्या प्रजातींची स्थानिक व शास्त्रिय नावे मोबाईल ॲप च्या मदतीने शोधून सर्वेक्षण केले. यासाठी इंदापूर नगरपरिषदेचे कर्मचारी अशोक चिंचकर यांनी अटल धनवन या जैवविविधता हॉटस्पॉट मध्ये लावले गेलेल्या सर्व वनस्पतींची स्वयंसेवकांना माहिती देवून मार्गदर्शन केले.





**''अटल धनवन'' येथिल लोक जैवविविधता सर्वेक्षण**

तसेच सर्वेक्षणाच्या दुसऱ्या टप्यात सर्व स्वयंसेवकांनी इंदापूर शहरातील कचरा डेपोतील विविध वनस्पतींच्या प्रजातींच्या व अनेक शोभेच्या वनस्पंतीची स्थानिक व शास्त्रीय नावे व त्यांचे औषधी उपयोग या विषयी माहिती घेतली. त्याचप्रमाणे याच परिसरात लावलेल्या विविध पालेभाज्यांची माहिती घेवून सर्वेक्षण केले. या वेळी इंदापूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मा. सौ. अंकिताताई मुकुंद शहा आणि इतर कर्मचाऱ्यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.





यावेळी डॉ. गजानन कदम, प्रा. मनिषा गायकवाड, प्रा. कल्पना भोसले, प्रा. दर्शन दळवी, प्रा. अविनाश सुर्यवंशी, डॉ. महंमद मुलाणी, प्रा. किरण गुणवरे, प्रा. अनिकेत हेगडे, प्रा. दत्तात्रय रास्ते, प्रा. ज्ञानेश्वर शिंदे, प्रा. वंदना व्यवहारे, प्रा. संतोष राऊत, प्रा. रूचिता होनराव, प्रा. प्रियंका गोळे, इत्यादी प्राध्यापक स्वयंसेवकांबरोबर लोक जैवविविधता सर्वेक्षणासाठी उपस्थित होते.




**दुपारचे सत्र**

दुपारच्या सत्रामध्ये शिबीरातील स्वयंसेवकांसाठी व गावातील ग्रामस्थांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये श्री. योगेश वाघ, श्री. प्रशांत ढवळे, श्री. प्रदिप ताटे, श्री. नागेश गायकवाड, श्री. अभिमन्यू टकले. प्रा. गौतम यादव, प्रा. मनिषा गायकवाड, डॉ. गजानन कदम, डॉ. महंमद मुलाणी, प्रा. रोहन व्यवहारे, प्रा. सागर भोसले, प्रा. नामदेव पवार, प्रा. अविनाश सुर्यवंशी, प्रा. दर्शन दळवी, प्रा.. दत्तात्रय रास्ते, प्रा. रणजित मोरे, प्रा. किरण गुणवरे, इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे वक्ते मा. योगेश वाघ यांनी इतिहासातील भटकंती या विषयावर विद्यार्थ्यांना अतिशय ओघवत्या शैलीत मार्गदर्शन केले. त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की वाचनाची आवड निर्माण झाल्याशिवाय समाज कळत नाही. खरतर मला विद्यार्थी दशेतच

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर करण्याची खुप इच्छा होती पण ते विद्यार्थी दशेत शक्य झाले नाही याचे शैल्य मला कायमच बोचत आलेले आहे.





*मा. योगेश वाघ शिबीरातील स्वयंसेवकांना मार्गदर्शन*

पण हे शैल्य कमी करण्याची संधी आज मला या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरामध्ये एक प्रमुख वक्ता म्हणून मिळाली याचा मला मनस्वी आनंद होतोय. ही संधी मला आपल्या महाविद्यालयाने व राष्ट्रीय सेवा योजनेने दिली याबद्दल मी आपला आभारी आहे.

मी गाडीवर सर्व भारतभर फिरलो लेहलडाख ते कन्याकुमारी हा प्रवास गाडीवरच केला. या प्रवासात मला अनेक मित्र जोडले गेले. पुस्तके वाचणाची आवड तर मला सुरूवातीपासूनच होती. बाहेर गेलो आणि पुस्तके विकत घेतले नाही असे सहसा होत नाही. त्याच्या जोडीनेच ही भटकंती करण्याची सवय मला लागली यामूळे माणसे आणि निसर्ग, गड, किल्ले इत्यादी मला वाचता आली. आणि माझ्या अनुभवात भर पडत गेली.

जगाने भारताच्या कल्पना चोरल्या आणि नवनिर्मीती केली पण भारतात नवनिर्मिती केली गेली नाही. याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे भारतीय लोक अध्यात्म, स्वर्गप्राप्ती,

मोक्षप्राप्ती, जन्नत, इत्यादी पार लौकीक कल्पनेमध्ये आडकले त्यामूळे ते नवनिर्मीतीपासून दूर गेले. यामुळे आपले प्रचंड मोठे नुकसान झालेले आहे. तुमच्या सारख्या युवकांनी नवनिर्मीतीकडे डोळस पणे पाहिले पाहिजे. नव्हे नव्हे स्वत:ला त्यामध्ये झोकून दिले पाहीजे. अशा प्रयत्नामुळे खरोखरच भारत बलशाली बनेल याचा मला पूर्ण विश्वास आहे.



मा. योगेश वाघ यांना प्रश्न विचारताना स्वयंसेवक

चैतन भगत या सुप्रसिध्द लेखकाने आयुष्य जगण्याचे दोन प्लॅन सांगितले आहे. यातील प्लॅन अ व ब हे होय.

प्लॅन अ – आता कॉलेज लाईफ मध्ये म्हणजे तुमच्या वयात जर तुम्ही अभ्यासाऐवजी गाडी, फेसबुक, व्हॉटसअॅप, इत्यादी मध्ये अडकलात आणि हिच मजा उपभोगलात तर त्याचे बिल ३० वर्ष वयापासून मरेपर्यंत येते जसे की लग्न, घर, गाडी, लोन, अजारपण, चिडचिड, मृत्यू.

प्लॅन बी– या वयामध्ये निर्णय घेयचा असतो अभ्यास करायचा असतो. त्यामुळे तुम्हाला मार्क, पर्याय, नोकरी, प्रमोशन, जगाचे दरवाजे उघडे होतात. त्यामुळे तुमचे जगणे सुखर होते मग नक्की ठरवा की तुम्ही कोणते प्लॅन निवडणार.

तुम्ही सर्व विद्यार्थी सुदैवी आहात कारण तुम्हाला खुप चांगले प्राचार्य मिळाले आहेत. त्यामुळे तुम्हाला असे शिबीरे करण्याची संधी मिळते. त्यामधून तुमचे व्यक्तीमत्व घडते तुम्ही सर्व प्रकारचे वाचन केले पाहिजे, बुध्द महाविर, श्रीकृष्ण, महाभारत, व जगभरातील इजम इत्यादीचे वाचन केले पाहिजे. जगाचा इतिहास वाचला पाहिजे, आपल्या देशाचा इतिहास तर खुप महत्वपूर्ण व मनोरंजक आहे. जगातील इतर देशापेक्षा दैदिप्यमान इतिहास आहे. मुस्लिम राजवटी, मराठेशाही, पेशवाई, इंग्रजसंत्ता नंतर स्वातंत्र्य ते आजपर्यत असा संपूर्ण इतिहासाचा पट आपणाला पहावयास मिळतो.

आपल्या प्रश्नाची उत्तरे आपणच शोधली पाहिजेत. ते उत्तर शोधण्यासाठी इतिहास तुम्हाला मदत करतो. इतिहासातील कोणती व्यक्ती, घटना प्रेरणादायी ठरेल व आपले आयुष्य बदलून टाकेल ते सांगता येत नाही. तुमचे वय हे आत्मसात करण्याचे आहे. बी प्लॅननुसार जगा आपले आदर्श समजून घ्या. त्याशिवाय आदर्श ठरवू नका आयूष्य खुप आनंदी आहे आनंदी जगा. एवढे बोलून आदरणीय मा. योगेश वाघ यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली.





या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. नामदेव पवार यांनी केले. पाहूण्यांचा परिचय डॉ. महंमद मुलाणी यांनी केला व कार्यक्रमाचे आभार प्रा. सागर भोसले यांनी केला.

यानंतर इंदापूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मा. सौ. अंकिताताई मुकुंद शहा यांनी या माळवाडी गावातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरास भेट दिली यादरम्यान आदरणीय

सौ. अकिताताई यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. व सर्व स्वयंसेवकांना शिबीरासाठी शुभेच्छा दिल्या .





इंदापूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मा. सौ. अंकिताताई शहा स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना

तसेच मा. सौ. अंकिताताई शहा यांनी शिबीरातील स्वयंसेवकांसाठी अतिशय चांगल्या पध्दतीने स्वयंपाक देखील केला. यावेळी त्या म्हणाल्या की कोणतेही काम असले तरी त्या कामाचा कंटाळा आला नाही पाहीचे तसेच विविध विषयावर चर्चा करत त्यांनी शिबिरातील स्वयंसेवकांसाठी भाकरी केल्या.





मा. सौ. अंकिताताई शहा शिबीरामदरम्यान स्वयंसेवकांसाठी स्वयंपाक करताना

यानंतर शिबीरातील स्वयंसेवकांना एकांकीकासाठी वेगवेगळे विषय देण्यात आले होते यामध्ये प्रत्येक ग्रुप ला त्या विषयानुसार १५ मिनिटे असा वेळ देण्यात आला होता. या एकांकिका मध्ये खालीलप्रमाणे विषय देण्यात आले होते.

१) हुंडाबळी

२) शेतकऱ्यांची आत्महत्या

३) मोबाईलचा दूरोपयोग

४) स्त्रीभृणहत्या

५) दारू बंदी

६) व्यसनमूक्ती

अशा प्रकारे सर्व ग्रुपने अतिशय सुंदर आणि अतिशय चांगल्या शैलीत या एकांकिका सादर केल्या.

ही एकाकिका पाहण्यासाठी माळवाडी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. शिबीरातील स्वयंसेवकांची एकांकीका पाहून माळवाडीतील ग्रामस्थांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले. या कार्यक्रमास माळवाडी मधील ग्रामस्थांचा अतिशय चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला.





यानंतर शिबीरातील सर्व स्वयंसेवक आणि प्राध्यापक यांनी जेवणाचा अस्वाद घेतला. आजच्या दिवशीच्या ग्रुप ने अतिशय चांगल्या प्रकारे जेवन तयार केले होते. आणि यानंतर सर्व स्वयंसेवक जेवणानंतर झोपण्यास गेले.

# अविस्मरणिय क्षण


OPPO F11 · © Akshay khochare


राष्ट्रीय सेवा योजना
OPPO F11 · © Akshay khochare






2020.01.06 18:14

# शिबिराचा पाचवा दिवस

# कवायत व प्रार्थना

नियमित पणे सर्व स्वयंसेकव पहाटे वेळेमध्ये योगासनाच्या जागेवरती उपस्थित होते. प्रा. फिरोज शेख यांनी योगासनाचे महत्व सांगितले ते म्हणाले 'जीवनात चांगले आरोग्य हि आनंदी जीवन निर्माण करते म्हणून योगासनाचा अभ्यास व प्रात्यक्षिक शिकणे आवश्यक आहे. प्रा. फिरोज शेख यांनी स्वयंसेवकांकडून योगासने करून घेतली. त्यानंतर अल्पोहार घेतल्यानंतर स्वयंसेवकांच्या निर्माण केलेल्या ग्रुप नुसार स्वयंसेवकांसोबत सर्व प्राध्यापक, कर्मचारी माळवाडी गावाच्या परिसरामध्ये ग्राम स्वच्छता करण्यासाठी पुढील सहा गट बाहेर पडले व कावेरी हा गट स्वयंपाकासाठी शिबिरास्थळी राहीला. १) गोदावरी २) नर्मदा ३) कृष्णा ४) भिमा ५) कावेरी ६) निरा

अशा प्रकारे सर्व स्वयंसेवक यांनी नाष्टा करून श्रमदान करण्यास माळवाडी नं. २ येथे प्रस्थान केले. तेथे पोहचल्यानंतर रस्ते स्वच्छ करण्यात आले यामध्ये सर्व स्वयंसेवकांना त्यांच्या गटाप्रमाणे कामे व साहित्य विभागून दिली. यामध्ये सर्व स्वयंसेवक यांनी विविध प्रकारच्या घोषणा देत स्वच्छता करण्यास सुरूवात केली.





आणि त्यांनी त्यांच्या गटांमध्ये विभागून दिले गेलेले काम कशा प्रकारे करता येईल अशी चर्चा करून कामास सुरूवात केली. सलग १ तास स्वच्छता करून झाल्यानंतर सर्व

स्वयंसेवकांना माळवाडी गावतील गणेशा मंदीर येथे ग्रुप नुसार बसविण्यात आले. याच दरम्यान इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे, अध्यक्ष मा. ना. श्री. हर्षवर्धनजी पाटील साहेब, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव, मा. श्री. मुकुंदशेट शहा साहेब, कला, विज्ञान आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे, माळवाडी गावचे उपसरपंच मा. दत्तात्रय पांढरे, माजी. सरपंच मा. श्री. संजय गार्डे, मा. श्री. अमोल व्यवहारे पोलिस पाटील माळवाडी नं. २ यांनी या शिबिरादरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबीरास सदिच्छा भेटळ दिली.

या कार्यक्रमास सुरूवात प्रथमत: दिप्रज्वलन करून झाली. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील साहेब, संस्थेचे सचिव मा. श्री. मुकुंदशेठ शहा, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे आणि माळवाडी नं.२ मधील ग्रामस्थांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.





संस्थेचे अध्यक्ष, सचिव आणि महाविद्यालयाचे प्राचार्य व माळवाडीतील ग्रामस्थ दिपप्रज्वलन करताना

यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेविकांनी एन.एस.एस.गीत गाऊन या कार्यक्रमाची सुरूवात झाली. यानंतर सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाचे अधिकारी प्रा. गौतम यादव यांनी केले.

D.R. Typing

 

**प्रा. गौतम यादव कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतानाचा क्षण**

यानंतर मान्यवरांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले यावेळी मा. हर्षवर्धनजी पाटील साहेब यांचा सत्कार संस्थेचे सचिव मा. मुकुदशेठ शहा यांनी केला व माळवाडी मधील ग्रामस्थांचा सत्कार मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील साहेब यांच्या हस्ते करण्यात आला.

 

यानंतर महाविद्यालयामध्ये विशेष नैपुण्या मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर विद्यार्थीनीचे मनोगत झाले. सोनाली चोपडे या स्वयंसेविकेने पहिल्या दिवशी उद्घाटनानंतर आमचे सात गट पाडण्या आले. असे सांगून हे सात गट विविध प्रकारची कामे करत होती. याची माहिती दिली. लोक जैवविविधता सर्वेक्षणामूळे आम्हाला प्राणी वनस्पती मृदा, पक्षी, इत्यादीचे आवलोकन करण्याची शास्त्रीय पध्दत



स्वयंसेवक सोनाली चोपडे मनोगत व्यक्त करताना

आम्हाला समजली. आणि हे ही लक्षात आले यापूर्वी आपण आपल्या सभोवताली असणाऱ्या प्राणी, पक्षी, वनस्पती, याकडे पाहत नव्हतो. पण आता खऱ्या अर्थाने या सर्वांकडे पाहण्याची दृष्टी आम्हाला या शिबीरातून मिळाली. या संपूर्ण शिबीरामध्ये अडजेस्टमेंन्ट आणि डेव्हलपमेंन्ट शिकलो खरोखरच शिबीरातून जे काही मिळाले ते शब्दात वर्णन न करता येण्यासारखे आहे. या शिबीरातून आम्ही खुप काही शिकलो. व्यक्तीमत्व विकासासाठी अशा शिबीराची नितांत अवश्यकता आहे.

प्राचार्य डॉ. संजय चाकणे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आपल्या या शिबीराच्या कामाची दखल केवळ विद्यापीठ पातळीवरच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर घेतली जाणार आहे. पुढच्या पंतप्रधानाच्या मन की बात मध्ये पंतप्रधान मोदी साहेब याची दखल घेवून आपल्या महाविद्यालयाचे नाव आणि आपले महाविद्यालय राबवित असलेले उपक्रम याची माहिती याद्वारे देशभर प्रसारित करणार आहेत.



आऊटस्टॅन्डींग आणि आऊटरिचसाठी आपले महाविद्यालय प्रथम क्रमांकावर आहे.

आय् कॉलेज प्रथम क्रमांकावर येण्यासाठी आपल्या संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील साहेब, संस्थेच्या उपाध्यक्षा पद्‌माताई भोसले, संस्थेचे सचिव मा. श्री. मुकुंदशेठ शहा, या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य नेहमीच लाभत असते. त्याचबरोबर एन. एस.एस. ची सर्व टिम आणि लोक जैवविविधता अभ्यास करणारी सर्व टिम सहभागी सर्व प्राध्यापक आणि सर्वात महत्वाचे म्हणजे स्वयंसेवक या सर्वांचा सहभाग व कृती अतिशय महत्वाची आहे.

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडाळाचे अध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील साहेब आपल्या मनोगतात म्हणाले की, सध्या आपण महात्मा गांधीजींची १५० वी जयंती साजरी करत आहोत. या जयंती उत्सवामध्ये स्वच्छता हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. या स्वच्छतेचे काम शिबीरार्थी अतिशय निष्ठेने करत आहेत. त्याच बरोबर माळवाडी हे गाव सुध्दा हिरीरीने सहभाग व सहकार्य करत आहे






**मा. हर्षवर्धनजी पाटील साहेब स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना**

शिबीर हे केवळ प्रमाणपत्रासाठी करावयाचे नसतात तर ते शिकण्यासाठी करावयाचे असतात. या शिकण्यामध्ये अनेक गोष्टीचा समावेश होतो की, अडजस्टमेंन्ट, ग्रामिण संस्कृती, ग्रामिण जीवन, कष्टकरी, गरीब यांचे जेवण अनुभवता येते. गावाची भौगोलिक

परस्थिती, सामाजिक परस्थिती, रूढी प्रथा परंपरा समजण्यासाठी अशी शिबीरे महत्वाची ठरतात.

विद्यार्थी परस्थितीशी जूळवून घेण्याची कला अशा शिबीरामधून शिकत असतात. संकटावर मात करणे म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय, जीवन जगण्याचे कौशल्य अशा शिबीरातून मिळते इतरांसोबत कसे वागावे समाजात कसे रहावे या सर्व गोष्टी आपण शिकत असतो.



जैवविविधतेबाबत चांगले संशोधन, विचार, कृती गरजेची आहे. महत्वाच्या आवश्यक वनस्पती प्राणी, पक्षी, यांचे जतन कसे करायचे हे ज्ञान आपल्याला मिळते असे मिळालेले ज्ञान आपण वाढवत नेले पाहिजे आणि निसर्गाचा समतोल राखला पाहीजे. तुम्हा सर्वांना हे नविन वर्ष सुखाचे जावो अशा शुभेच्छा देतो आणि थांबतो.

## दुपारचे सत्र

कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा. प्रकाश पांढरमिसे (श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय, बावडा) यांचे आगमन झाले. प्रा. प्रकाश पांढरमिसे यांचे आगमन झाल्यानंतर सर्वांनी एन.एस.एस च्या क्ल्याप देवून त्यांचे स्वागत केले. प्रा. प्रकाश पांढरमिसे यांनी छत्रपती शिवराय आणि तरूणाई या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या विषयावर बोलत असताना ते म्हणाले की, छत्रपती शिवराय यांच्या स्वराज्याचा वचननामा होता की, सर्व रयतेस पोटास लावणे आहे. हल्लीच्या शासनकर्त्याचा

अश्वासननामा असतो. सर्व रयतेस देशोधडीस लावणे आहे. आणि स्वत:मात्र मालामाल होणे आहे. अशा कणखर भाषेमध्ये भ्रष्टाचारी नेत्यांच्या विरोधामध्ये टिका करत त्याच्या व्यख्यानास सुरूवात केली. तरूणाविषयी बोलत असताना ते म्हणाले की, हल्ली महापूरूषांच्या जयंती, पूण्यतिथी यांच आयोजन केले जाते ते आयोजन तरूणाई करते त्या निमित्ताने बॅनरबाजी केली जाते. महापुरूषांचे चित्र छोटेसे आणि बॅनर लावणा—याचे चित्र हे भले मोठे असते. त्यावरती शुभेच्छा देताना काही वाक्य लिहीली जात. ती त्या महापुरूषाच्या विचाराला धरून असलेले दिसत नाही. तरूणाईला भडकविण्यासाठी काही वाक्य लिहीली जातात.






प्रा. प्रकाश पांढरमिसे स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना

त्यांनी खालील पद्धतीच्या वाक्यांचा उल्लेख केला.

१) ''एकच फाईट वातावरण टाईट''

२) ''बघतोस काय मुजरा कर''

३) ''मिटवून घे नाहितर पेटवून देईन''

अशा प्रकारच्या वाक्यांचा उल्लेख करत प्रा. पांढरमिसे यांनी सत्यपरिस्थिती यातुन दर्शविले. यामध्ये ते म्हणाले की आजचा तरूण महापुरूंषांच्या नावाखाली किंवा त्यांच्या

जयंती पुण्यतिथीच्या नावाखाली हा फक्त बॅनरबाजी करतो आहे. आणि वरील पद्धतीची वाक्य त्या बॅनर वर लिहीलेली असतात. त्यामध्ये प्रा. प्रकाश पांढरमिसे म्हणाले की, कोणत्याही महापुरूषांनी कधीही आणि कोठेही ही वरील वाक्याचा कधी उल्लेख केला नाही तरीही आजचा तरूण हा त्यांच्या नावाखाली असली वाक्य बॅनरवरती लावतात. ते म्हणाले जे छत्रपती शिवरायांचे विचार इतर राष्ट्रांना समजले ते आमच्या तरूणाईला आजूनही समजू शकले नाही. छत्रपती शिवरायांच्या शिवचरित्र्यातून काय शिकावे हेच अजून समजलेल नाही या सारख दुसरे दुरदैवं नाही ही खंत त्यांनी आपल्या प्रखर आणि प्रभावी वाणी द्वारे शिबिरातील स्वयंसेवकांसमोर माडले.

अशा प्रकारे प्रा. पांढरमिसे यांनी अतिशय सुंदर आणि अगदी कणखर अशा शब्दात स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोनाली भरणे या स्वयंसेविकेने केले तर पाहुण्यांचा परिचय डॉ. महंमद मुलाणी यांनी केला आणि आभार प्रिया काळवेल या स्वयंसेविकेने मानले.

यानंतर स्वयंसेवकांना ३.३० ते ४.०० पर्यत स्वयंसेवकांना चहा साठी स ुट्टी देण्यात आली. त्यानंतर ४.०० ते ५.३० या वेळेत इंदापूर पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक (पी.एस.आय) मा. श्री. दाजी देठे साहेब यांचे मार्गदर्शन आयोजित केले होते. यावेळी मार्गदर्शन करताना देठेसाहेब म्हणाले की तुम्ही विद्यार्थी आहात आणि शिकणे हे विद्यार्थ्याचे प्रमुख कर्तव्य आहे. मी सुध्दा मराठी माध्यमाच्या ग्रामिण शाळेत शिकलो कधीही कारणांचा बाऊ केला नाही तर कायम परस्थितीवर मात ठेवण्याची जिद्द ठेवले बी.ए चे शिक्षण झाल्यानंतर पुणे विद्यापीठामध्ये राज्यशास्त्र विभागामध्ये मी पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. सहाजिकच सर्वांना पडतो तसा प्रश्न मला हि पडला तो म्हणजे पुण्यात रहायचे कोठे या भितीपोठी दोन महिने पुण्यालाच गेलो नाही मग माझे नाव राज्यशास्त्र विभागाच्या सुचना फलकावर लावले गेले त्याचा आशय असा होता की तुमचा प्रवेश का रद्य करण्यात येवू नये. मग मी विभागप्रमुखाना भेटलो त्यांना मी माझी सर्व हकीकत सांगितली कसा बसा राहण्याचा प्रश्न सुटला थोडेसे हायसे वाटले. परंतु पुढे काही नविनच वाढून ठेवले होते ते म्हणजे तिथे इग्रजी मधून शिकविले जात होते.

आपण आता मराठी माध्यमाचे शिकवले इग्रजी माध्यमातून तर काय अवस्था झाली असेल याचा अंदाज तुम्हाला येंईलच पण आम्हाला मदत करणारे आमचे सिनिअर नामदेव पवार, शिवाजी मोटेगावकर, सुनिल कनकटे, इत्यांदी आम्हाला खुप मदत केली अनेक संकल्पना समजावून सांगितल्या स्वत: काढलेल्या नोटस दिल्या त्यामुळे मी द्वितीय श्रेणीमध्ये उतिर्ण झालो तोपर्यंत माझे ही ध्यैय प्राध्यापकच बनण्याचे होते. पण मध्यंतरीच एम पी एस सी चा एक निकाल लागला व त्यात अनेक विद्यार्थी उतीर्ण झाले व मला हि मनापासून आपण स्पर्धा परिक्षा करावी व प्रशासकिय अधिकारी व्हावे. आता आदर्श तर स्पर्धा परिक्षेचा ठेवला पण सुरूवात शुन्यातून करायची होती. मग मी स्पर्धा परिक्षेच्या बाराखडी गिरवू लागलो. अनेक याही बाबतीत जयकर ग्रंथालयातील अनेक सहकार्यांनी मार्गदर्शन केले आणि सांगितले की अभ्यासक्रम आणि प्रश्नपत्रिका यांचा सुक्ष्म अभ्यास कर मग मी संपूर्ण सिल्याबस आणि प्रश्नपत्रिका अतिशय बारकाईने वाचल्या. आणि मग माझा मोर्चा पाचवी ते बारावी या बेसिक वाचनाकडे वळला साहजिकच सर्वासमोर जो र्पडतो काय वाचावे आणि कसे वाचावे तसा मलाही पडला होता पण अशा सर्व प्रश्नांची उत्तरे स्वत:ला शोधावी लागतात पण यावेळी आलेले अनुभव आणि वाचलेली पुस्तके मार्गदर्शक ठरतात. आणि मि तर अभ्यासक्रम आणि प्रश्नपत्रिका अतिशय बारकाईने वाचलेली असल्याने नक्की काय वाचावे आणि काय वेचावे हे मला समजायचे.

त्याचबरोबर मी दररोज किमान अडीच तास वर्तमान पत्राचे वाचन करत असे. सिल्याबस आणि प्रश्नपत्रिका पेपर वाचताना मला कायम मार्गदर्शक ठरत असत. पेपर कसा वाचावा काय महत्वाचे असते, इत्यादीची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. त्याचबरोबर प्रशिक्षण कालावधीमध्ये जे काही वेगवेगळे चित्तथरारक अनुभव आले होते त्या अनुभवाचे चित्र स्वयंसेवकासमोर उभे केले. आपण शोशल मिडिया वापरत असताना काय दक्षता घेतली पाहिजे याचे मार्गदर्शन केले.

 

पोलिस उपनिरिक्षक मा. दाजी देठे साहेब स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना

विद्यार्थी दशेत इतर कोणत्याही गोष्टीकडे लक्ष न देता तुम्ही तुमच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा. कायम आपल्या आई वडिलांचे आठवण ठेवा आणि ध्येय प्राप्तीसाठी स्वत:ला झोकून द्या. जागा खुप कमी येतात याचा विचार न करता मीच अधिकारी होणार हा आत्मविश्वास ठेवून तयारी करा यश तुमचे. या व्याख्यानानंतर स्वयंसेवकांनी अनेक प्रश्न विचारले त्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली. सदर कार्यक्रमाचे सुत्र संचालन व पाहुण्यांचा परिचय प्रा. नामदेव पवार यांनी केला तर आभार प्रा. फिरोज शेख यांनी मानले.

यानंतर स्वयंसेवकांना १ तास सुट्टी देण्यात आली. आणि यानंतर सर्व स्वयंसेवकांना आयत्या वेळेचे विषय देवून त्यावर स्वयंसेवकांना दोन मिनिटे बोलण्याचे वेळ आले.

# अविस्मरणिय क्षण












# शिबिराचा चौथा दिवस

# कवायत व प्रार्थना

'जीवनात चांगले आरोग्य, हे आनंदी जीवन निर्माण करते म्हणून योगासनाचा अभ्यास व प्रात्यक्षिक शिकणे आवश्यक आहे. प्रा. फिरोज शेख यांनी स्वयंसेवकांकडून योगासने करून घेतली. त्यानंतर अल्पोहार घेतल्यानंतर स्वयंसेवकांच्या निर्माण केलेल्या ग्रुप नुसार स्वयंसेवकांसोबत सर्व प्राध्यापक, कर्मचारी इंदापूर शहरात स्वच्छतेसाठी रवाना झाले.

सर्व ग्रुपला कामे विभागून देण्यात आली होती यावेळी स्वयंसेवकांनी बाबा चौक ते बायपास पर्यंतच्या जुन्या महामार्गावरील दुभाजकावरील सर्व कचरा काढून घेतला.





कचरा काढून झाल्यानंतर जवळपास 250 झाडे लावली. सर्व कचरा काढून घंटागाडीमध्ये टाकला. छोटे छोटे खड्डे खोदून त्यामध्ये झाडे लावण्यात आली. शेवटी नगराध्यक्षा सौ.अंकिताताई शहा, संस्थेचे सचिव मुकुंदशेठ शहा यांच्या हस्ते पण काही झाडे लावण्यात आली.





सर्व स्वयंसेवकांना संस्थेचे अध्यक्ष मा.हर्षवर्धन पाटीलसाहेब यांच्या भाग्यश्री बंगल्यावर चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली. त्याठिकाणी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ.भरत भूजबळ यांचे स्वयंसेवकांना मार्गदर्शन लाभले यावेळी म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना एका सुसंकृत तरुणाईला घडवत आहे.आपले

स्वयंसेवक हे उत्कृष्ठ कामगिरी करत आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेबरोबरच डॉ.भरत भूजबळ यांनी खेळाचे महत्वदेखील अधोरेखित केले. यामध्ये त्यांनी शारीरिक आणि शैक्षणिक फायदे विद्यार्थ्यांना समजून संगितले.

**1)शारीरिक फायदे :-**

1)आरोग्य तंदुरुस्त राहते.

2) आळस येत नाही.

3) बौद्धिक पातळीत वाढ होते.

4) मानसिक आरोग्य तंदुरुस्त राहते.

**2) शैक्षणिक फायदे :-**

1) विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षामध्ये दोन क्रेडिट मिळतात.

2) स्पर्धा परीक्षांमध्ये आरक्षण मिळते.







सरांनी मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजना, खेळाचे जीवनातील महत्व यांची आरोग्याशी सांगड घालत विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी शिबीरादरम्यान करण्यात आलेल्या कामाचे कौतुक केले. त्यामध्ये विशेषकरून लोक जैवविविधतेच्या सर्वेचा भविष्यकाळासाठी महत्वाचा आणि उपयोगी ठरणार असल्याचे संगितले.

यावेळी त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# अविस्मरणीय क्षण













NSS
SPPU
2020.01.05 19:27






NSS
SPPU












2020.01.08

2020.01.08

2020.01.08







OPPO F11 · ©Akshay khochare

नवराष्ट्र

सुधाकर बोराटे

## माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे मत

# जुळवून घेण्याची कला शिबिरातून मिळते



इंदापूर : केवळ प्रमाणपत्र मिळवण्यासाठी शिबिर करावयाचे नाही तर ग्रामीण संस्कृती, ग्रामीण जीवन, भौगोलिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, रूढी-परंपरा अनुभवण्यासाठी अशी शिबिरे उपयोगी ठरत असतात. विविध परिस्थितीशी जुळवून घेण्याची कला या शिबिराच्या माध्यमातून उपलब्ध होत असते. तर या दृष्टीने जीवन जगण्याचे कौशल्यही मिळते. जैवविविधतेच्या बाबतीत चांगले संशोधन आणि कृतीची गरज आहे, याविषयीची प्राथमिक माहिती देखील या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना होणार असल्याचे मत माजी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर-माळवाडी नं.२ येथे बोलताना व्यक्त केले. हर्षवर्धन पाटील हे इंदापूर येथिल कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय आयोजित माळवाडी नं.२ , येथिल राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे शेलारमामा सुवर्णपदक विजेते प्रा. दत्ता रास्ते, सुवर्ण पदक विजेत्या निलीमाताई पवार, हर्षदा बारवकर, वैष्णवी शिंदे यांचेसह, राष्ट्रीय सेवा योजनेच्या लखनौ येथील राष्ट्रीय शिबिरासाठी निवड झालेल्या कुमार शिंदे यांचा सत्कार हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

## २०० स्वयंसेवक झाले सहभागी

३ ते ९ जानेवारी या दरम्यान विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये २०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. या गावातील स्वच्छता, ग्रामीण जीवन, जैवविविधता, बाजार, भूमी, पाणी, प्राणी याविषयीची माहिती संकलित करणार असुन विविध विषयावर जाणीव जागृती देखील करणार आहेत. शिबिराचे उदघाटन संस्थेचे सचिव मुकुंद शहा यांनी केले. हर्षवर्धन पाटील यांनी आज भेट देऊन, कामाची पाहणी करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे सचिव मुकुंद शहा, माजी सरपंच संजय गार्डे, उपसरपंच दत्तात्रय पांढरे, उपप्राचार्य नागनाथ ढवळे, राजू गार्डे, बापू गार्डे, ग्रामपंचायत सदस्य सतीश मोरे, लक्ष्मण चौधरी, डॉ. शिवाजी वीर,प्रा. मनोहर बेंद्रे उपस्थित होते. प्रास्ताविक गौतम यादव यांनी केले.

# समाजशील विद्यार्थी घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे उपयुक्त – हर्षवर्धन पाटील



बाभुळगाव/प्रतिनिधी:

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माळवाडी नंबर– २ येथील विशेष हिवाळी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्याचे माजी संसदीय व सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी वरील मत व्यक्त केले. ३ जानेवारी ते ९ जानेवारी या दरम्यान विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये २०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. या गावातील स्वच्छता, ग्रामीण जीवन, जैवविविधता, बाजार ,भूमी , पाणी, प्राणी याविषयीची माहिती संकलित करणार आहेत तसेच विविध विषयावर जाणीव जागृती देखील करणार आहेत. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे सचिव मुकुंद शहा यांनी केले. हर्षवर्धन पाटील यांनी आज भेट देऊन, कामाची पाहणी करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हर्षवर्धन पाटील म्हणाले की,' केवळ प्रमाणपत्र मिळवण्यासाठी शिबिर करावयाचे नाही तर ग्रामीण संस्कृती, ग्रामीण जीवन, भौगोलिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, रूढी-परंपरा अनुभवण्यासाठी हे शिबिर उपयोगी ठरतात. विविध परिस्थिती जुळवून घेण्याची कला या शिबिराच्या माध्यमातून उपलब्ध होत असते या दृष्टीने जीवन जगण्याचे कौशल्य मिळते. जैवविविधतेच्या बाबतीत चांगले संशोधन आणि कृतीची गरज आहे याविषयीची प्राथमिक माहितीदेखील या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे शेलारमामा सुवर्णपदक मिळाल्याबद्दल प्रा. दत्ता रास्ते, श्रीमती. निलीमाताई पवार सुवर्णपदक मिळाल्याबद्दल हर्षदा बारवकर, बेसबॉल मध्ये सुवर्णपदक मिळाल्याबद्दल वैष्णवी शिंदे , राष्ट्रीय सेवा योजनेच्या लखनौ येथील राष्ट्रीय शिबिरासाठी निवड झाल्याबद्दल कुमार शिंदे यांचा सत्कार हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय चाकणे म्हणाले की,' हे शिबिर जैवविविधतेच्या दृष्टीने वेगळे असून या शिबिराची दखल विद्यापीठ बरोबरच राष्ट्रीय पातळीवर देखील घेतली जाणार आहे. संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव मुकुंद शहा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय सर्व पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करीत आहे.सोनाली चोपडे या स्वयंसेविकेने यावेळी मनोगत व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे सचिव मुकुंद शहा, माजी सरपंच संजय गार्डे, उपसरपंच दत्तात्रय पांढरे, उपप्राचार्य प्रा. नागनाथ ढवळे, राजू गार्डे, बापू गार्डे, ग्रामपंचायत सदस्य सतीश मोरे, लक्ष्मण (बापू )चौधरी, डॉ. शिवाजी वीर,प्रा. मनोहर बेंद्रे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. गौतम यादव यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. फिरोज शेख यांनी केले.आभार कार्यक्रमाधिकारी रासेयोअधिकारी प्रा. मनीषा गायकवाड यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. गौतम यादव, डॉ. गजानन कदम,प्रा. मनीषा गायकवाड, प्रा. कल्पना भोसले, प्रा. भारत शेंडे तसेच डॉ. महंमद मुलाणी, प्रा. अविनाश सूर्यवंशी,प्रा. ज्ञानेश्वर शिंदे, प्रा. नामदेव पवार, प्रा. विशाल मोरे, प्रा. सागर भोसले,प्रा. रोहन व्यवहारे, प्रा. दर्शन दळवी, प्रा. पुनम मोहिते, कोमल राऊत यांनी शिबीर यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# समाजशील विद्यार्थी घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे महत्त्वाची



## हर्षवर्धन पाटील यांचे मत

**इंदापूर, (प्रतिनिधी) :** समाजशील विद्यार्थी घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे महत्वाची आहेत, असे मत कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माळवाडी नंबर २ येथील विशेष हिवाळी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केले.

३ जानेवारी ते ९ जानेवारी या दरम्यान विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये २०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. या गावातील स्वच्छता, ग्रामीण जीवन, जैवविविधता, बाजार , भूमी , पाणी, प्राणी याविषयीची माहिती संकलित करणार आहेत तसेच विविध विषयावर जाणीव जागृती देखील करणार आहेत. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे सचिव मुकुंद शहा यांनी केले. हर्षवर्धन पाटील यांनी आज भेट देऊन, कामाची पाहणी करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे शेलारमामा सुवर्णपदक मिळाल्याबद्दल प्रा. दत्ता रास्ते, निलीमाताई पवार सुवर्णपदक मिळाल्याबद्दल हर्षदा बारवकर, बेसबॉल मध्ये सुवर्णपदक मिळाल्याबद्दल वैष्णवी शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या लखनौ येथील राष्ट्रीय शिबिरासाठी निवड झाल्याबद्दल कुमार शिंदे यांचा सत्कार हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव मुकुंद शहा, माजी सरपंच संजय गार्डे, उपसरपंच दत्तात्रय पांढरे, उपप्राचार्य प्रा. नागनाथ ढवळे, राजू गार्डे, बापू गार्डे, ग्रामपंचायत सदस्य सतीश मोरे, लक्ष्मण (बापू) चौधरी, डॉ. शिवाजी वीर, प्रा. मनोहर [illegible] उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. [illegible] यादव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. फिरोज शेख यांनी केले. प्रा. मनिषा [illegible] यांनी आभार मानले.

# शिबिराचा सातवा दिवस

# समारोप समारंभ

D.R.Typing

# अहवाल लेखन





- अहवाल लेखन – प्रा. नामदेव पवार
- टायपिंग – प्रा. दत्ता रास्ते
- छायाचित्रे – हर्षवर्धन नलवडे

## !! धन्यवाद !!

*D.R.Typing*